


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ६५ वा | मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# 'टाटा-बिर्ला, अंबानी या आणि गाव विकत घ्या'

## माढा तालुक्यातील ग्रामस्थांनी गावाचं काढलं विकायला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 'आमचं गाव विक्रीसाठी आहे, कोणी तरी विकत घ्या'... सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील तुळशी गावात लावण्यात आलेल्या या बॅनरने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. गेल्या २५ वर्षांपासून सुरू असलेल्या पाणीप्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी हा अनोखा मार्ग अवलंबला आहे.

तुळशी गावातील ग्रामस्थ गेल्या अनेक वर्षांपासून सीना-माढा उपसा जलसिंचन योजनेचे पाणी गावाला मिळावे, अशी मागणी करत आहेत. मात्र, अद्याप त्यांच्या मागणीची दखल घेतली गेलेली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी आता थेट 'गाव विक्रीसाठी' असल्याचा बॅनर लावून प्रशासनाचा निषेध केला आहे.

**२५ वर्षांपासून पाण्याची प्रतीक्षा**

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, उजनी धरणातून २००० साली सीना-माढा उपसा जलसिंचन योजना सुरू करण्यात आली. मात्र, या योजनेत सुरुवातीपासूनच तुळशी गावाचा समावेश करण्यात आला नव्हता. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून गावाला या योजनेच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे.

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने गावातील पाणीटंचाई आणखी गंभीर झाली आहे. पिण्याच्या पाण्यासोबतच शेतीसाठीही पुरेसे पाणी उपलब्ध होत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या पिकांवर होत आहे.

**१२ शेतकऱ्यांचे आमरण उपोषण**

पाण्याच्या मागणीसाठी उजनी पाणी संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली १४ ऑक्टोबरपासून तुळशी गावात १२ शेतकऱ्यांनी बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाला पाच दिवस उलटूनही प्रशासनाकडून प्रश्न सोडवण्यासाठी ठोस पावले उचलली गेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रशासनाकडून प्रतिसाद मिळत नसल्याने आंदोलन आणखी तीव्र करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला. त्यानंतर गावात 'आमचं गाव विक्रीसाठी आहे, कोणी तरी विकत घ्या' असा बॅनर लावण्यात आला.

गावाला सीना-माढा योजनेचे पाणी मिळाले, तर पाण्याचा हा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटू शकतो, अशी ग्रामस्थांची भूमिका आहे.

**'टाटा-बिर्ला, अंबानी या आणि गाव विकत घ्या'**

ग्रामस्थांनी या बॅनरच्या माध्यमातून प्रशासनावर उपरोधिक टीका केली आहे. 'टाटा-बिर्ला, अंबानी या आणि गाव विकत घ्या, आम्हाला पाणी द्या', अशा शब्दांत त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली. पाण्याचा प्रश्न केवळ शेतीपुरता मर्यादित नसल्याचेही ग्रामस्थ सांगतात. पाणी उपलब्ध नसल्यामुळे गावातील दैनंदिन जीवनावरही त्याचा परिणाम होत आहे. पाण्याची सुविधा नसल्याने तरुण-तरुणींच्या विवाहासाठीही अडचणी




निर्माण होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मागणी करूनही प्रश्न सुटत नसल्याने अखेर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी हा अनोखा मार्ग स्वीकारला आहे. आता सिना-माढा उपसा जलसिंचन योजनेचे पाणी तुळशी गावापर्यंत कधी पोहोचणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. 'गाव विक्रीसाठी'चा बॅनर आणि सुरू असलेले आमरण उपोषण यामुळे प्रशासन या प्रश्नावर काय भूमिका घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक पतसंस्थेला १०.०२ कोटी नफा

## वार्षिक सभेत शिवाजी पाटील यांची माहिती: सभासदांना १० टक्के लाभांश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेची ८६ वी वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक २७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १.०० वाजता वृंदावनम. लॉन्स,एम आय जामगोंडी फार्म,जुळे सोलापूर येथे संस्थेचे अध्यक्ष शिवाजी महादेव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.



अध्यक्ष शिवाजी पाटील यांनी अध्यक्षीय मनोगतामध्ये संस्थेस सन २०२५-२६ सालाचा नफा १०कोटी ०२ लाख ८१ हजार इतका विक्रमी झाला, तसेच संस्थेकडे अहवाल साल अखेर ठेवी २३५कोटी ७४ लाख,भाग भांडवल ५९ कोटी ४५ लाख,गंगाजळी १४ कोटी ३० लाख असे जमा असून संस्थेच्या १३ शाखा आहेत. प्रत्येक शाखेला संस्थेच्या अद्यावत इमारती असून स्थावर जंगम मालमत्तेच्या रूपाने आज अखेर ५ कोटी ४२ लाख रक्कमेची संस्थेची मालमत्ता आहे. तर ३१ मार्च २०२६अखेर एन.पी.ए.(बुडीत कर्ज) साठी र.रू.२ कोटी ८१ लाख तरतूद संस्थेने केलेली असून कजार्शी थकबाकीचे प्रमाण १.६९ टक्के आहे.

दिनांक ३१/३/२०२६ अखेर संस्थेचे ६४४० सभासद असून अहवाल सालात १५६ कोटी ९५ लाखाचे संस्थेने कर्ज वाटप केले असून १४० कोटी २९ लाखाचे कर्ज वसुल झाले आहे. येणे कर्ज बाकी ३४५ कोटी ०५ लाख आहे. कर्जावर द.सा.द.शे. ९ रू.६० पैसे दरांने व्याज घेतले जाते तर ठेवीवर ८ रू४० पैसे.दरांने व्याज दिले जाते.संस्था नाममात्र १ रू.२० पैशावर कारभार करीत आहे दोन लाख रुपये संस्थेच्या कर्ज मयार्देत वाढ करुन एकुण कर्ज मयार्दा रु ३५ लाख ७५ हजार रुपये झाली तसेच संस्थेच्या सभासदांना लाभांश १०% सभेच्या मंजुरीनंतर लाभांश सभासदांच्या वैयक्तिक बँक खात्यावर जमा करण्याचे सांगितले, सर्व मान्यवरांचे शब्दसुमनांनी उपाध्यक्ष गुलाबराव आप्पासाहेब पाटील यांनी स्वागत केले व सभेचे विषय वाचन चिटणीस उमाकांत शिवाजी घाडगे यांनी केले त्यास सर्व सभासदांनी मंजुरी दिली आभार संचालक रामभाऊ यादव यांनी मानले.

वार्षिक साधारण सभेनंतर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक सेवानिवृत्त शिक्षक संघाचे अध्यक्ष शिवानंद भरले, सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष उत्तमराव जमदाडे शिक्षक संघाचे नेते रावसाहेब जाधवर, बब्रुवान काशीद सोलापूर जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष विरभद्र यादवाड शिक्षक संघाचे अध्यक्ष रणजीत थिटे, आदर्श समितीचे अध्यक्ष संजीव चाफाकारंडे, शुभहस्ते संस्थेकडून सामाजिक उपक्रम म्हणून जिल्हयातील गुणवंत शिक्षकांना आदर्श शिक्षक म्हणून व उत्कृष्ट शाळांना आदर्श शाळा पुरस्कार म्हणून सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले, तसेच फेब्रु/मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी, इयत्ता बारावी (कला, वाणिज्य, विज्ञान), इयत्ता ४थी , ५ वी शिष्यवृत्ती (शहरी व ग्रामिण) तसेच इयत्ता ७वी, ८ वी शिष्यवृत्ती (शहरी व ग्रामिण) परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकडून संस्थेस प्राप्त झालेल्या अजार्पैकी प्रत्येकी प्रथम ५ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव वार्षिक साधारण सभेनंतर वरील मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष शिवाजी महादेव पाटील यांनी यावेळी दिली.

संस्थेचे अध्यक्ष शिवाजी पाटील उपाध्यक्ष गुलाबराव पाटील, संचालक अशोक पोमाजी, अनिरूद्ध पवार, रामभाऊ यादव, रमेश घंटनेवरू, तानाजी गुंड, पाडुरंग नाईकनवरे, संजय चेळेकर, विठ्ठल काळे, रमेश शिंदे, हनुमंत सरडे, आबासाहेब जाधवर, राजेंद्र आवारे, संभाजी फुले, रविंद्र पाटील,शितल चव्हाण राणी व्हनमाने,तज्ञ संचालक सिध्देश्वर तिखटे, इक्कबाल नदाफ, संस्थेचे चिटणीस उमाकांत शिवाजी घाडगे व हिशोबनीस सुधीर भोसले तसेच सुत्रसंचालन सतिश वाले व महिबुसाब सवार आणि अंजली रणदिवे यांनी केले व मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

# सोलापूरातील १८ अभियंत्यांना 'उत्तम अभियंता पुरस्कार-२०२६' जाहीर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अभियंता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सोलापुरातील विविध शासकीय विभागांमध्ये कार्यरत १८ अभियंत्यांची 'सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या उत्तम अभियंता पुरस्कार-२०२६' साठी निवड करण्यात आली आहे. या पुरस्कारांचे वितरण मंगळवार दि. २९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता शिवस्मारक सभागृह, शिंदे चौक, जनता बँकेजवळ, नवी पेठ, सोलापूर येथे होणार असल्याची माहिती आशुतोष नाटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी, कला, क्रीडा, साहित्य व सांस्कृतिक मंच, सोलापूर यांच्या वतीने हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

सोलापूरमधील विविध शासकीय विभागांमध्ये कार्यरत अभियंत्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली व हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून महावितरणचे निवृत्त मुख्य अभियंता लक्ष्मीदास सोनकवडे, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के आणि ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. नसिमा पठाण उपस्थित राहणार आहेत.

पुरस्कारासाठी निवड झालेल्यांमध्ये इंजि. डॉ. विशाल विजयकुमार कांबळे (अधिव्याख्याता, स्थापत्य अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर), इंजि. विजय तुकाराम रुपनर (विभागीय अभियंता-स्थापत्य, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन, सोलापूर), इंजि. शेख खालिद सलीम अब्दुल हकीम (उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, शेळफळ, ता. मोहोळ), इंजि. महेश रामचंद्र काळे (पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग, पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर), इंजि. धीरज सिद्धप्पा बड्डे (सहायक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उत्तर सोलापूर), इंजि. प्रदीप तानाजी मोरे (अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण, सोलापूर), इंजि. हेमंत धनसिंग ताकपेरे, इंजि. श्रीमती प्रा. डॉ. प्रणोती राजेंद्र डोके आणि इंजि. निलेश सूर्यभान देशमुख यांचा समावेश आहे.

तसेच इंजि. सुमित गोविंद पिसे (सहायक अभियंता, महावितरण चाचणी विभाग, सोलापूर), इंजि. प्रेमसागर रामकिसन कोरे (सहायक अभियंता श्रेणी-१, (पान 2 वर..)

# नोंदणीकृत खरेदीदस्ताची फेरफार नोंद नामंजूर केल्याचा आरोप

## मंडल अधिकारी सुखदेव पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नोंदणीकृत खरेदीदस्त झालेला असतानाही फेरफार नोंद नामंजूर करून अधिकाराचा गैरवापर केल्याचा आरोप करत उत्तर सोलापूर तालुक्यातील हगलूर येथील प्रकाश मनोहर चव्हाण यांनी तत्कालीन मंडल अधिकारी सुखदेव आप्पाराव पाटील, शेळगी यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करून सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी केली आहे. याबाबत त्यांनी विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.

चव्हाण यांच्या म्हणण्यानुसार, मौजे हगलूर येथील शेतजमीन गट क्रमांक ११७ मधील एकूण ०० हेक्टर ८१ आर क्षेत्रापैकी ४०.५ आर जमीन त्यांनी खरेदीदस्त क्रमांक ८७३१/२०२४ अन्वये नोंदणीकृत खरेदीदस्त करून घेतली आहे. मात्र, संबंधित जमिनीची फेरफार नोंद तत्कालीन मंडल अधिकारी सुखदेव पाटील यांनी नामंजूर केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**शासनाच्या परिपत्रकाचा भंग केल्याचा आरोप**

जिरायत जमिनीसाठी २० गुंठे आणि बागायती जमिनीसाठी १० गुंठे क्षेत्राचा खरेदीदस्त झाल्यानंतर संबंधित खरेदीदाराचे नाव ७/१२ उताऱ्यावर नोंदविता येते, असा शासनाचा परिपत्रकीय नियम असल्याचा दावा चव्हाण यांनी केला आहे. असे असताना संबंधित मंडल अधिकाऱ्यांनी फेरफार नोंद नामंजूर



करून शासनाच्या नियम व अटींचा भंग केला असल्याचा आरोप त्यांनी निवेदनात केला आहे.

केवळ स्वतःच्या प्रकरणापुरताच हा प्रकार मर्यादित नसून संबंधित मंडलाच्या कार्यक्षेत्रातील एकरूख, तरटगाव, हिप्परगा, हगलूर, राळेरास आणि होनसळ या गावांमधील अनेक शेतकऱ्यांच्या नोंदणीकृत खरेदीदस्तांवरही चुकीचे शेरे मारून फेरफार नोंदी नामंजूर करण्यात आल्याचा आरोप चव्हाण यांनी केला आहे.

**माहितीच्या अधिकारातून प्रकरण उघड झाल्याचा दावा**

संबंधित प्रकरणातील माहिती माहितीच्या अधिकारातून प्राप्त झाल्याचा दावा चव्हाण यांनी केला आहे. या माहितीनुसार, सुमारे २५ शेतकऱ्यांनी नोंदणीकृत खरेदीदस्त केलेले असतानाही त्यांच्या फेरफार नोंदी नामंजूर करण्यात आल्याचे समोर आल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा व अधिकाराचा गैरवापर केला आहे का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**यापूर्वीही कारवाई झाल्याचा दावा**

संबंधित मंडल अधिकाऱ्यांवर यापूवीर्ही अधिकाराचा गैरवापर केल्याप्रकरणी कारवाई करण्यात आल्याचे चव्हाण यांनी निवेदनात नमूद केले आहे. मात्र, कठोर कायदेशीर कारवाई करण्याऐवजी केवळ कारवाई झाल्याचे दाखविण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी ३० जानेवारी २०२६ रोजी निलंबनाची कारवाई करून त्यानंतर पुन्हा सेवेत रुजू करून घेतल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून संबंधित अधिकाऱ्याची जबाबदारी निश्चित करावी, तसेच शासनाच्या नियमांचा भंग आणि अधिकाराचा गैरवापर सिद्ध झाल्यास फौजदारी गुन्हा दाखल करून सेवेतून बडतर्फ करण्याची कारवाई करावी, अशी मागणी चव्हाण यांनी केली आहे.

**कारवाई न झाल्यास पुण्यात आमरण उपोषण**

आपल्या तक्रारीवर प्रशासनाने तातडीने दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी प्रकाश चव्हाण यांनी विभागीय आयुक्तांकडे केली आहे. प्रशासनाकडून अपेक्षित कारवाई न झाल्यास १२ ऑक्टोबर २०२६ पासून पुणे येथील संबंधित कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

# ज्ञानेशकुमार यांनी ताबडतोब राजीनामा द्यावा, त्यांना अटक करावी- खा प्रणिती शिंदे



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भाजपच्या राजकीय फायद्यासाठी मतदार यादीत फेरफार करून वोटचोरी करणाऱ्या मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून दूर करून तात्काळ अटक करण्यात यावी, तसेच त्यांच्या कार्यकाळात मतदार याद्यांमध्ये झालेल्या फेरबदलांची स्वतंत्रपणे चौकशी करण्यात यावी, या मागण्यांसाठी खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर शहर व जिल्हा काँग्रेसच्या वतीने जिल्हा परिषद पूनम गेटसमोर जोरदार निदर्शने आंदोलन करण्यात आले. यावेळी सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे आणि जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या प्रमुख उपस्थितीत काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत निवडणूक प्रक्रियेतील अनियमिततेविरोधात संताप व्यक्त केला.

आंदोलनादरम्यान ज्ञानेश कुमार यांच्या वेशभूषेतील व्यक्तीला प्रतीकात्मक बेड्या ठोकून निषेध करण्यात आला. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित (पान 2 वर..)

# कोलंबो, श्रीलंकेत 'ग्लोबल अचिव्हर्स अवॉर्ड २०२६' सोहळा उत्साहात संपन्न

**कोलंबो, श्रीलंका (वृत्त सेवा):-** कर्नाटक स्टेट डिजिटल मीडिया असोसिएशन (KSDMA) यांच्या वतीने आयोजित 'ग्लोबल अचिव्हर्स अवॉर्ड श्रीलंका २०२६' हा आंतरराष्ट्रीय सन्मान सोहळा २० सप्टेंबर ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत कोलंबो, श्रीलंका येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.






विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा या सोहळ्यात गौरव करण्यात आला. कार्यक्रमास महर्षी डॉ. आनंद गुरुजी, हॅप्पी हेल्दी हॉस्पिटलचे प्रसिद्ध डॉक्टर डॉ. नागराजय्या, डॉ. ज्योती, प्रसिद्ध आयुर्वेद व मुद्रा प्रशिक्षक डॉ. लता शेखर, समाजसेवक श्री. रवींद्र शेट्टी, आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. नागराज आणि श्री. प्रकाश पॅलेट हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच KSDMA चे पदाधिकारी व सदस्यही मोठ्या संख्येने सहभागी झाले.

**सदाशिव शिवाचार्य महास्वामीजींचा भव्य सन्मान**

या सोहळ्यात श्री ष. ब्र. १०८ सद्गुरु सदाशिव शिवाचार्य महास्वामीजी, श्री बृहन्मठ, वेळापूर यांचा आध्यात्मिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि समाजप्रबोधनाच्या क्षेत्रातील योगदानाबद्दल भव्य सत्कार व सन्मान करण्यात आला.

सदाशिव शिवाचार्य महास्वामीजी हे संतपरंपरेतील आध्यात्मिक मार्गदर्शक म्हणून कार्यरत असून धर्म, अध्यात्म, सदाचार, संस्कार, मानवसेवा आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांचा समाजात प्रसार करण्यासाठी मार्गदर्शन करीत आहेत. भक्ती आणि अध्यात्म यांच्यासोबतच समाजामध्ये नैतिक मूल्ये, बंधुभाव, सेवाभाव आणि संस्कारांची जपणूक व्हावी, हा त्यांच्या कार्याचा महत्त्वाचा भाग आहे.

श्री बृहन्मठ, वेळापूर या आध्यात्मिक परंपरेच्या माध्यमातून धार्मिक व सांस्कृतिक मूल्यांचे जतन, अध्यात्मिक मार्गदर्शन आणि समाजप्रबोधनाची परंपरा पुढे नेली जात आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील या आध्यात्मिक परंपरेचा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर गौरव होणे ही विशेष उल्लेखनीय बाब ठरली.

महास्वामीजींचा श्रीलंकेतील या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर झालेला सन्मान हा त्यांच्या कायार्चा गौरव करण्याबरोबरच भारतीय संतपरंपरा, अध्यात्म आणि संस्कृतीच्या मूल्यांचा सन्मान असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

**सौ. प्रा. गायत्री गौरीशंकर बिराजदार यांचाही आंतरराष्ट्रीय सन्मान**

याच कार्यक्रमात सौ. प्रा. गायत्री गौरीशंकर बिराजदार यांचाही शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मान करण्यात आला.

ग्रामीण आणि महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी अनेक वर्षे शैक्षणिक कार्य केले आहे. आर्थिक व सामाजिकदृष्ट्या वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रयत्न करणे, मुलींच्या शिक्षणासाठी जनजागृती करणे, महिला सक्षमीकरण, सामाजिक जागृती आणि विद्यार्थी मार्गदर्शन या क्षेत्रांत त्यांनी सातत्याने कार्य केले आहे.

कन्नड माध्यमातील ग्रामीण विद्यार्थ्यांना मराठी विषयातील शैक्षणिक साहित्य समजून घेण्यासाठी मार्गदर्शन करणे, विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांना आत्मविश्वास देणे, पालकांशी संवाद साधणे तसेच शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करणे, ही त्यांच्या कायार्ची वैशिष्ट्ये आहेत.

शिक्षण, सामाजिक सेवा, विद्यार्थी सक्षमीकरण, व्यक्तिमत्त्व विकास, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक जागृती या विविध क्षेत्रांतील त्यांच्या योगदानाची दखल घेत श्रीलंकेतील या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर त्यांचा गौरव करण्यात आला.

सौ. प्रा. गायत्री बिराजदार यांचा हा सन्मान ग्रामीण भागातील शिक्षणसेवेला मिळालेली आंतरराष्ट्रीय पातळीवरील दखल असून, सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी कार्य करणाऱ्या शिक्षकांसाठीही तो प्रेरणादायी असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

**भारत-श्रीलंका सांस्कृतिक व सामाजिक संबंधांना बळकटी**

या आंतरराष्ट्रीय सोहळ्याच्या माध्यमातून भारतातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळाले. आध्यात्मिक, शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य, आयुर्वेद आणि समाजसेवा क्षेत्रातील कार्याचा गौरव या कार्यक्रमात करण्यात आला.

भारत आणि श्रीलंका यांच्यातील सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक आणि मानवी मूल्यांचे संबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरला. विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

२० ते २४ सप्टेंबर २०२६ दरम्यान कोलंबो, श्रीलंका येथे झालेल्या 'ग्लोबल अचिव्हर्स अवॉर्ड २०२६' सोहळ्याने आध्यात्मिक, शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य आणि आयुर्वेद क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याला आंतरराष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

## संपादकीय

# ‘एसआयआर’च्या पडद्याआड नेमके चाललेय काय?

खुद्द निवडणूक आयुक्तांनीच नोंदवलेल्या आक्षेपांचे प्रकरण उघडकीस आल्यामुळे पूर्वीपासूनच वादग्रस्त ठरलेल्या मतदारयाद्यांच्या सखोल पडताळणीच्या (एसआयआर) प्रक्रियेवर पुन्हा गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे; सोबतच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्यावर मनमानी आणि एकाधिकारशाहीचे आरोप करणाऱ्या विरोधकांना यातून बळ मिळाले, असे म्हणावे लागेल. आयुक्त सुखबीरसिंग संधू आणि विवेक जोशी यांनी ज्ञानेशकुमार यांच्या निर्णयांबाबत चौदा वेळा लेखी आक्षेप नोंदवून त्यापैकी अनेक निर्णय ‘बेकायदा’ आणि ‘अधिकार क्षेत्राबाहेरील’ असल्याचे म्हटल्यामुळे या स्वायत्त संस्थेच्या कारभाराबाबत शंका निर्माण होणे साहजिक आहे.

देशभरात गदारोळ झाल्यानंतर ‘भिन्न मते हा प्रक्रियेचाच भाग असून, हे निर्णय एकमतानेच झाले,’ असे निवडणूक आयोगाने म्हटले असले, तरी त्यात अनेक मूळ प्रश्नांना बगल दिलेली दिसते. दुसरीकडे विरोधी पक्षांनी ‘एसआयआर’ प्रक्रियेला स्थगिती देण्यापासून ते ज्ञानेशकुमार यांना हटवावे आणि त्यांच्या काळातील सर्व निवडणुकांच्या चौकशीचीही मागणी केली आहे. राजकीय मुद्दे बाजूला ठेवले, तरी या दोघा आयुक्तांनी घेतलेल्या हरकतींचे पुढे काय झाले आणि आयोगाचे निर्णय कायद्यानुसार आहेत का, याची पारदर्शक चौकशी होऊन सत्य समोर यायलाच हवे.

गेल्या काही काळात विरोधी पक्षांकडून मतदान यंत्रांबाबत संशय किंवा ‘व्होट चोरी’ सारखे आरोप होत झाले आणि बिहारपासून पुढे अनेक राज्यांमध्ये आयोगाच्या ‘एसआयआर’ मोहिमेबाबतही सर्वोच्च न्यायालयापासून रस्त्यावर मोठे वादळ उभे राहिले. मात्र, आता दोघा निवडणूक आयुक्तांनीच या प्रक्रियेबाबत मूलभूत आक्षेप घेतले होते आणि त्यानंतरही ही मोहीम तशीच रेटण्यात आली, अशी माहिती समोर आल्याने आयोगाच्या कारभाराभोवती शंकांचे मोहोळ उभे राहिले आहे.

नव्या मतदारांना यादीत नाव नोंदवण्यासाठी पालकांचा मतदारयादीतील इतिहास दाखवण्याची अट घालण्यात आली; तो रकाना भरणे बंधनकारक नसले, तरी त्याविना अर्ज दाखलच होत नव्हता, असा देशभरातील अनुभव आहे. या अर्जाच्या नमुन्यात बदल करण्याचे अधिकारच आयोगाला नाहीत; त्यासाठी सरकारच्या निर्णयाची गरज आहे, असे आक्षेप दोघांनी नोंदवले होते. या मोहिमेसाठी वापरलेल्या संगणकप्रणालीच्या अवाजवी केंद्रीकरणाचाही मुद्दा महत्त्वाचा आहे. मतदारयादीत नावांचा समावेश किंवा वगळणे, हा सर्वस्वी स्थानिक मतदार नोंदणी अधिकाऱ्याचा (ईआरओ) कायदेशीर अधिकार आहे, खुद्द आयोगालाही त्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही; असे असताना गोव्यातील ९७ मतदार या ‘ईआरओं’नी पात्र ठरवल्यानंतरही संगणकप्रणालीद्वारे ते नाकारले गेले. त्यामुळे या मतदारांच्या घटनादत्त मताधिकारावर गदा आल्याचे मानले जाते.

मुळात कोणा एका व्यक्तीच्या हाती सर्वाधिकार हे लोकशाही तत्त्वांशी विसंगत असल्याने हा आयोग बहुसदस्यीय असावा, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटल्यानंतर तीन दशकांपूर्वी तीन निवडणूक आयुक्तांची नियुक्ती होऊ लागली. त्यातही आयोगाचे निर्णय ह्यएकमताने’ वा ‘बहुमताने’ होणे कायद्याला अपेक्षित आहे. मात्र, येथे तिघांपैकी दोघांनी हरकत घेतलेली असताना निर्णय होतात कसे, हे कोडेच आहे आणि दोघांचे मत डावलून निर्णय झाले असतीलच, तर ते बेकायदा ठरतात.

‘एसआयआर’मध्ये आजवर तीस राज्यांतील सुमारे १३ कोटी नावे वगळण्यात आली आहेत; त्यांचा आधारच बेकायदा ठरला, तर या संपूर्ण मोहिमेविषयी प्रश्नचिन्ह उभे राहणारच. यामुळे निवडणूक आयोगाची स्वायत्तता व विश्वासार्हतासुद्धा धोक्यात आल्यामुळे या साऱ्याच प्रकरणात तिन्ही आयुक्तांनी एकत्रितपणे प्रत्येक आरोपावर स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. आयोगात समान अधिकार असलेल्या तिघा आयुक्तांमधील मतभेद आणि ते उघडकीला आल्याने उभा राहिलेला पेच गंभीर असल्यामुळेच ‘पुढे काय’ हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. निवडणूक आयोग स्वायत्त असला, तरी देशातील प्रत्येक निर्णय हा न्यायालयीन आढाव्याच्या कक्षेत येतोच; तसेच संसदेचे व्यासपीठही त्यासाठी सक्षम आहे. त्यामुळे या आरोपांचा सोक्षमोक्ष लावणे हे सर्वसामान्यांचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास कायम राहण्यासाठी अत्यंत गरजेचे आहे.

# पितृऋण की माणुसकी?

माणूस मेल्यानंतर त्याच्या स्वर्गातल्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून पित्रे जेवू घातले जातात. आता बघा हं....... जेवू कोणाला घालतात.... मराठ्यांचा बाप मराठा, ब्राह्मणाचा बाप ब्राह्मण, चांभाराचा बाप चांभार, माळ्यांचा बाप माळी, महाराचा बाप महार तर मंग माणूस मेल्यावर कावळाच का? कुणी राजहंस असावा, कुणी बगळा असावा, तर कुणी मोर, बदक असावा ना...... जिवंतपणी माणसामाणसात भेदभाव तर मेल्यावर समानता असे का? बरं तो स्वर्गातच जातो का? कुणीही रचला हा ढोंगीपणा? तर तो पिढ्यानपिढ्या चालत आला आहे. त्यामध्ये बदल करायचा नाही का? समाज, माणसं, परिस्थिती आज बदलली. पण त्याच रूढी, परंपरांच्या नावाखाली आपण बदलतच नाही.

पितृपक्ष आला की घराघरांत पूर्वजांचे स्मरण होते. श्राद्ध, तर्पण, पिंडदान, ब्राह्मणभोजन, अन्नदान असे अनेक विधी श्रद्धेने केले जातात. परंपरा जपली जाते, संस्कार जपले जातात. पण मनात एक प्रश्न नक्कीच उमटतो... ज्यांनी आपल्याला जन्म दिला, वाढवले, शिकवले, स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवून आपल्यासाठी आयुष्य खर्च केले ते आईवडील, आजी आजोबा जिवंत असताना आपण त्यांची किती काळजी घेतो? कधी कधी आई-वडील घरात असतात, पण त्यांच्याशी बोलायला आपल्याकडे वेळ नसतो. त्यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी वेळ नसतो. त्यांच्या छोट्या-छोट्या गरजा आपल्याला त्रासदायक वाटतात. त्यांच्या जुन्या गोष्टी ऐकायला आपण कंटाळतो. पण तेच आईवडील, आजी आजोबा या जगातून गेल्यानंतर मात्र आपण मोठ्या श्रद्धेने पितृपक्ष करतो. त्यांच्या नावाने मोठा खर्च करतो. विधी करतो. अन्नदान करतो. समाजाला सांगतो की, ‘आम्ही पितरांचे ऋण फेडतो’ म्हणजे कावळ्याला घास ठेवतो.

पण एक साधा प्रश्न स्वतःला विचारायला हवा ज्यांना जिवंतपणी दोन प्रेमाचे शब्द, थोडा वेळ आणि आपुलकीची साथ हवी होती, ती आपण दिली का? पितरांना अन्न अर्पण करण्यापेक्षा जिवंत असताना त्यांना प्रेमाने जेवायला घालणे अधिक मोलाचे नाही का?

त्यांच्या आठवणींसाठी विधी करण्यापेक्षा, त्यांच्या जिवंतपणी त्यांच्या हातात हात ठेवून ‘तुम्ही आहात म्हणून आम्ही आहोत’ असे सांगणे अधिक सुंदर नाही का ? त्यांना महागड्या वस्तूंची नेहमीच गरज नसते. त्यांना हवी असते आपुलकी, आदर, संवाद आणि आपल्या माणसांची सोबत. पितृपक्ष हा परंपरा जपण्याचा काळ आहेच, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे तो आपल्याला एक जाणीव करून देणारा काळ आहे. ज्यांच्यासाठी आपण श्राद्ध करणार आहोत, त्यांची काळजी ते जिवंत असतानाच घ्या. कारण मृत्यूनंतर केलेल्या विधींमध्ये श्रद्धा असू शकते, पण जिवंतपणी केलेल्या सेवेमध्ये प्रेम असते. आज आई-वडील, आजी आजोबा तुमच्यासोबत आहेत, तर त्यांच्यासाठी वेळ काढा. त्यांच्या जवळ बसा. त्यांच्या आवडीचे काहीतरी करून द्या. त्यांच्या औषधांची, तब्येतीची काळजी घ्या. त्यांच्या मनातले ऐका. आणि सर्वांत महत्त्वाचे त्यांना कधीही असे वाटू देऊ नका की, ‘आपली मुलं आपल्यासाठी वेळ काढत नाहीत’ लक्षात ठेवा पितृपक्ष वर्षातून एकदा येतो, पण आई-वडिलांची गरज रोज असते. ठेच लागली तर 'आई गं' असे म्हणतो.

केवळ हिंदू धर्मशास्त्रातच असा अन्न, पाणी देण्याचा विचार मांडला आहे असे नाही, तर पारशी, खिश्चन, मुस्लीम, जैन अशाही धर्मांमध्ये पितरांना अन्न, पाणी देण्याची प्रथा आहे. मेक्सिको मध्ये "मृतांचा दिवस" हा सण, चिनमध्ये मृत पूर्वजांविषयी "शी" या नावाने समारंभ, कंबोडिया मध्ये "हॉलिडे ऑफ प्चुम बेन" या नावाने वार्षिक समारंभ तर जपान मध्ये "कामी" अशा पद्धतीने समारंभ किंवा पित्राची आठवण केली जाते. तर आपल्याकडे पूर्वज, पवित्र म्हणून कावळा पक्षाला घास ठेवला जातो. हे असे कावळ्याला जेवू घातल्यानंतर आपल्या पूर्वजांच्या आत्म्याला शांती मिळेल ही मानसिकता कधी बदलेल. त्यापेक्षा एखाद्या गरीब मुलाला अन्न, पुस्तक देऊया. निराधार, बेघर वृद्ध किंवा गरजू बांधवांच्या आयुष्यत थोडा आधार देऊया, त्याच्या प्रगतीचा हिस्सा होण्याचा छोटासा प्रयत्न करूया. अन्नाचा काल्पनिक धूर स्वर्गात पोहोचवून आत्म्यांना खुश करण्यापेक्षा जिवंत आसणाऱ्या आत्म्यांच्या जिवनात शैक्षणिक व वैज्ञानिक प्रगतीची मशाल पेटवू या.......

**- प्रा. काटकर तात्यासाहेब शिवाजी**
9226144836 अकलूज
(महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक असून शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेखन करतात)

# शेतकऱ्यांना शासनाने प्रतिटन अनुदान द्यावे - स्वरूपाराणी मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि. मुंबई, या संस्थेची सन २०२५-२६ या वषार्ची अधिमंडळाची ७० वी वार्षिक सर्वसाधारण सोमवार दिनांक २८/०९/२०२६ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे संपन्न झाली.यावेळी कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील यांनी आयत्या वेळच्या विषयात वेगवेगळी मागणी केली.

सदर सभेस साखर संघाचे अध्यक्ष पी.आर.पाटील, उपाध्यक्ष प्रताप ओव्हाळ,बाळासाहेब पाटील, राजेश टोपे, जयप्रकाश साळुंके, कल्याणराव काळे, आबासाहेब पाटील, धनाजी साठे, विवेक कोल्हे, व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ व इतर मान्यवरांच्या उपस्थित संपन्न झाली.

या वार्षिक सर्वसाधारण सभेस, सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर अकलूज या साखर कारखान्याच्या वतीने प्रतिनिधी म्हणून कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते पाटील ह्या उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी आयत्या वेळच्या विषयात, ऊसाची एफ. आर.पी. व साखर विक्रीची किंमत (एम.एस.पी.) लिंक करणे गरजेचे आहे व राज्यातील दुष्काळी परिस्थिती पाहता ऊसाचे एकरी उत्पादन घटणार असून, सहकारी साखर कारखान्यांना ऊस देणाऱ्या शेतकऱ्यांना, शासनाने प्रतिटन अनुदान द्यावे अशी मागणी केली.

सदर मागणीची अध्यक्ष यांनी दखल घेऊन तसा ठराव करून शासनाकडे पाठविण्याच्या संबंधितांना सूचना दिल्या.

# समाज कल्याण विभागामार्फत सोलापूर जिल्ह्यात ‘सेवा संकल्प अभियान’

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकीर्दीला 25 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने तसेच ‘सेवा परमोधर्म’ या भावनेतून शासनाच्या विविध सेवा व कल्याणकारी योजनांचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने राज्यात 17 सप्टेंबर ते 17 ऑक्टोबर 2026 या कालावधीत ‘सेवा संकल्प अभियान’ राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येणाऱ्या या अभियानांतर्गत समाज कल्याण विभागामार्फत सोलापूर जिल्ह्यात तालुकास्तरावर तसेच सोलापूर शहरातील शासकीय वसतिगृहे व निवासी शाळांमध्ये विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

अभियानाच्या कालावधीत रक्तदान शिबिर, अनाथालय व वृद्धाश्रम भेट, वृक्षारोपण, स्वच्छता सेवा, आरोग्य तपासणी शिबिर, योग व ध्यान सत्र, प्लास्टिकमुक्ती जनजागृती, महिलांचे आरोग्य व स्वच्छता, वंचित मुलांना शैक्षणिक सहकार्य, व्यसनमुक्त भारत जनजागृती, सायबर सुरक्षा जनजागृती, मतदार जागरूकता व नोंदणी तसेच शासकीय व जनकल्याणकारी योजनांबाबत जनजागृती असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय प्रतीके आणि विकसित भारताची संकल्पना या विषयावर आधारित मानवी रांगोळी साकारण्यात येणार असून, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन ‘आशीवार्दाचा दीप’ प्रज्वलित करण्यासह विविध उपक्रमही राबविण्यात येणार आहेत.

‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत सेवा सेतू अभियान, ‘Innovation Challenge - सेवा माझे योगदान’, विकसित भारत संकल्प यात्रा, सेवा ज्योती यात्रा, चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा, अंगणवाडी उत्सव, आशीवार्दाचा दिवा, बदलाची गोष्ट, आभार आणि संकल्पची रांगोळी, नमो सेवागाथा, जल जन आणि सेवा संकल्प यात्रा तसेच जनसेवक महाकुंभ यांसारखे विविध उपक्रम राज्यभर राबविण्यात येत आहेत.

या अभियानात समाज कल्याण विभागाचे अधिकारी व कर्मचारी, शासकीय वसतिगृहांचे गृहप्रमुख व गृहपाल, निवासी शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी तसेच वसतिगृहे व निवासी शाळांमधील विद्यार्थी-विद्यार्थिनी उत्स्फूर्तपणे सहभागी होणार आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनीही ‘सेवा संकल्प अभियानात’ सक्रिय सहभाग नोंदवून विविध समाजोपयोगी उपक्रमांना सहकार्य करावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

पान १ वरून

## ज्ञानेशकुमार यांनी ताबडतोब...

शहा आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आल्याने परिसर दणाणून गेला.

याप्रसंगी खासदार प्रणितीताई शिंदे म्हणाले की, काँग्रेस आज संपूर्ण देशभरात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आंदोलन करत आहे. ज्ञानेश कुमार यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, त्यांच्यावरील आरोपांची चौकशी करण्यात यावी. त्यांना ताबडतोब अटक करावी. ही आमची प्रमुख मागणी आहे.

मोदी आणि अमित शहा यांच्या भाजपच्या राजकीय फायद्यासाठी मतदार यादीत फेरफार करून वोटचोरी केली. Form 6 मध्ये नियमबाह्य पद्धतीने बदल करण्यात आला. देशाचे नागरिक कोण आहेत हे ठरविण्याचे अधिकार नाही. विशेष म्हणजे, निवडणूक आयोगातीलच दोन आयुक्तांनी काही निर्णयांवर आक्षेप नोंदविले. निवडणूक आयोगातीलच दोन आयुक्तांनी निर्णय प्रक्रियेबाबत आक्षेप नोंदवले असल्यामुळे ते कोणीही फेटाळू शकत नाही. निवडणूक आयोगाच्या आडून जर मतदारांच्या अधिकारांशी खेळ केला जात असेल, तर हा केवळ राजकीय पक्षाचा प्रश्न नाही; हा देशातील प्रत्येक नागरिकाच्या मतदानाच्या अधिकाराचा प्रश्न आहे. वोटचोरी म्हणजे केवळ मते चोरणे नाही; वोटचोरी म्हणजे देशाच्या लोकशाहीचा DNA बदलण्याचा, आत्मा बदलण्याचा प्रयत्न आहे. या देशाचा आत्मा संविधान, लोकशाही, सर्वधर्मसमभाव आणि प्रत्येक नागरिकाला मिळालेला मतदानाचा अधिकार आहे. हा देश कोणत्याही एका पक्षाच्या किंवा विचारसरणीच्या आधारे चालणार नाही; हा देश संविधानाच्या आधारावर चालतो. पण हा देश फक्त विचारसरणीचा बनविण्याचा घाणेरडा प्रयत्न मोदी अमित शहा ज्ञानेशकुमार यांच्याकडून होत आहे. संविधान आणि लोकशाहीचा आत्मा बदलण्याचा कोणताही प्रयत्न काँग्रेस कधीही होऊ देणार नाही. पेपरलीकमुळे धर्मेंद्र प्रधान यांची विकेट गेली. दुसरी विकेट आत्ता ज्ञानेशकुमार यांची जाणार आहे. तिसरी विकेट कोणाची उडणार हे सवार्नाच माहीत आहे.

आज देशातील शेतकरी संकटात आहे, दुष्काळ जाहीर झाला पण त्याचा कोणताही उपयोग शेतकऱ्यांना होताना दिसून येत नाही त्यामुळे तो बोगस जी आर आम्ही जाळणार आहे. तसेच ट्रम्प तात्यांना खुश करण्यासाठी UPI सारखा मोठ्ठा राक्षस लोकांच्या मानगुटीवर आणून बसविला आहे. सामान्य नागरिक त्रस्त आहे, युवक रोजगाराच्या प्रश्नाने त्रस्त आहेत. दुष्काळ, महागाई, बेरोजगारी यांसारखे गंभीर प्रश्न जनतेसमोर असताना निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि मतदारांचा अधिकार अधिक महत्त्वाचा ठरतो. जनतेच्या मताचा अधिकारच सुरक्षित राहिला नाही, तर लोकशाही कशी सुरक्षित राहणार? रक्फ च्या प्रक्रियेबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. देशातील मतदार याद्यांमधून चुकीच्या पद्धतीने १३ कोटींपेक्षा अधिक नावे वगळण्यात आली आहेत.

देशाचा आत्मा संविधान आहे, देशाचा आत्मा लोकशाही आहे आणि देशाचा आत्मा प्रत्येक नागरिकाचा मतदानाचा अधिकार आहे. हा आत्मा कोणीही बदलू शकत नाही आणि काँग्रेस तो बदलू देणारही नाही. ज्ञानेश कुमार यांच्यावरील आरोपांची चौकशी झालीच पाहिजे, त्यांनी राजीनामा दिलाच पाहिजे आणि त्यांना ताबडतोब अटकही केली पाहिजे.

वोटचोरीविरोधातील काँग्रेसचा हा लढा जनतेच्या मताच्या अधिकारासाठी आणि संविधानाच्या रक्षणासाठी आहे, असे खासदार प्रणितीताई शिंदे यांनी स्पष्ट केले.

या आंदोलनात खासदार प्रणितीताई शिंदे, शहराध्यक्ष नरोटे, जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, तालुका अध्यक्ष भीमाशंकर जमादार, भारत जाधव, प्रशांत साळे, सुलेमान तांबोळी, संदीप पाटील, किशोर पवार, अमोल भुमकर, सतीश पाचकुडवे, राहुल घुले, उपाध्यक्ष राजेश पवार, सुरेश हावळे, नगरसेवक नरसिंह आसादे, माजी महापौर आरिफ शेख, कार्याध्यक्ष मनोजदादा यलगुलवार, शहर युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, प्रदेश सरचिटणीस ॲड. केशव इंगळे, श्रीशैल रणधिरे, ब्लॉक अध्यक्ष देवाभाऊ गायकवाड, बाबुराव म्हेत्रे, उदयशंकर चाकोते, परशुराम सत्तारवाले, लक्ष्मीकांत साका, शिवशंकर अजनाळकर, अब्दुल खालिक मुल्ला, सेवादल शहर अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, अल्पसंख्यांक विभाग शहराध्यक्ष जुबेरभाई कुरेशी, शकील मौलवी, महिला अध्यक्ष प्रमिलाताई तूपलवंडे, मागासवर्गीय विभाग अध्यक्ष सागर उबाळे, भटके विमुक्त जाती जमाती विभाग शहराध्यक्ष युवराज जाधव, विद्यार्थी संघटना अध्यक्ष शरद गुमटे, पृथ्वीराज नरोटे, गणेशअप्पा नरोटे, असंघटित कामगार कर्मचारी संघटना विभाग अध्यक्ष सुभाष वाघमारे, सुशिक्षित बेरोजगार सेल अध्यक्ष रुपेश गायकवाड, उद्योग-वाणिज्य सेल अध्यक्ष पशुपती माशाळ, प्रवक्ता सेल अध्यक्ष नागनाथ कदम, झोपडपट्टी व जीर्णचाळी विकास अध्यक्ष बसवराज म्हेत्रे, शहर मध्य युवक अध्यक्ष वाहिद विजापूरे, यंग ब्रिगेड सेवादल अध्यक्ष विवेक कन्ना, शिक्षक सेल अध्यक्ष सुबोध सुतकर, माजी नगरसेवक दत्तूअण्णा बंडपट्टे, एन. के. क्षिरसागर, हरून शेख, हाजी मैनुद्दीन शेख, माजी महिला अध्यक्ष हेमाताई चिंचवडकर जाधव, ॲड. करीमोनिसा बागवान, सेवादल महिला शहराध्यक्ष रेखा बिनेकर, माजी नगरसेविका भारती ईपलपल्ली, नसीम खलिफा, आयाज आळंद, अंबादास गुत्तीकोंडा, प्रा. भोजराज पवार आदी उपस्थित होते.

## सोलापूरातील १८ अभियंत्यांना ‘उत्तम अभियंता...

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, सोलापूर), इंजि. सागर विश्वास खरे (पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग, सोलापूर ग्रामीण), इंजि. सिद्धेश्वर कालिदास भोसले (उपविभागीय अभियंता, उजनी प्रकल्प पुनर्वसन उपविभाग, पंढरपूर), इंजि. राजरत्न महादेवराव रणदिवे (उप अभियंता, यांत्रिकी उपविभाग, सोलापूर), इंजि. अमर दिलीप काळे (सहायक अभियंता श्रेणी-२, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर), इंजि. विश्वास बलभीम शिंदे (वरिष्ठ तांत्रिक अधिकारी, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग), इंजि. सुजय सुभाष वाघचौरे (कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर) आणि इंजि. चंद्रकांत दादाराव जाधव (यांत्रिकी गटनिर्देशक, महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर) यांचीही पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

अभियांत्रिकी क्षेत्रात विविध शासकीय विभागांमध्ये कार्यरत असलेल्या अभियंत्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन त्यांचा सन्मान करण्यासाठी या पुरस्काराचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास अभियंते, अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मालमत्तेच्या वादातून प्राणघातक हल्ला

## आरोपीला उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन- ॲड. जयदीप माने



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मालमत्तेच्या वादातून झालेल्या प्राणघातक हल्ला प्रकरणी माळशिरस पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील आरोपी संदीपन भीमराव रूपनवर याला मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने अटकपूर्व जामीन मंजूर केला.

दि. २५ जून २०२६ रोजी शेतीच्या जमिनीवरील हक्क व पिकाच्या उत्पन्नावरून दोन्ही कुटुंबांमध्ये वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. फियार्दी आणी त्याचा भावाला आरोपींनी दगड, लाथा व बुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले असे सरकार पक्षाचे म्हणने होते.

आरोपीने माळशिरस सत्र न्यायालयात दाखल केलेला अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळलेला होता. त्यानंतर आरोपीने ॲड. जयदीप माने यांच्यामार्फत कोल्हापूर उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता.

या प्रकरणात बचाव पक्षातर्फे ॲड. जयदीप माने यांनी न्यायालयासमोर बाजू मांडताना न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, घटने दिवशी फिर्यादीने आरोपी संदीपान याला चाकूने मारून जखमी केले होते व त्याबाबत आरोपीच्या भावाने फिर्याद दिलेली आहे आणि त्या फिर्यादीला शह देण्यासाठी आरोपींना खोट्या गुन्ह्यात गुंतवले आहे, आरोपीच्या घरातील शाळेत हजर असणाऱ्या अल्पवयीन मुलास देखील गुंतवण्यास कमी केले नाही. दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून न्यायमूर्तींनी आरोपी संदिपान रुपनवर याचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला.

या प्रकरणी आरोपीतर्फ ॲड. जयदीप माने यांनी तर सरकार तर्फे ॲड. शुभांगी देशमुख यांनी काम पाहिले.

# खुनाच्या गुन्ह्यातील जन्मठेपेच्या शिक्षेतून मायलेकींची उच्च न्यायालयातून निर्दोष मुक्तता- ॲड. रितेश थोबडे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** हौसाबाई महादेव मल्लाव हिस जीवे ठार मारल्या प्रकरणी साखराबाई शिवाजी मल्लाव व तिची मुलगी अनिता विजय भोई रा. तिन्हे, तालुका उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर यांना झालेली जन्मठेपेची शिक्षा उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शर्मिला देशमुख व न्यायमूर्ती नीरज धोटे यांनी रद्दबातल करून दोघींची निर्दोष मुक्तता केली.



यात हकीकत अशी की, मयत हौसाबाई व आरोपी साखराबाई या दोन्ही सख्ख्या बहिणी होत्या व ते तिन्हे येथे एकमेकांच्या शेजारी राहत होते. साखराबाई हिचे पतीसोबत मयत हौसाबाई हिचे अनैतिक संबंध असल्याचा संशय होता. दिनांक-12/12/2020 रोजी मयत हौसाबाई ही तिच्या घरात एकटीच झोपली होती. त्यावेळी दरवाजावर काहीतरी आवाज आला म्हणून तिने दरवाजा उघडला त्यावेळी आरोपी साखराबाई, तिची मुलगी अनिता व इतर लोक हे घरात घुसले. त्यावेळी साखराबाई हिने चाकूने वार केला त्यावर हौसाबाई हिने आरडाओरडा केला असता त्यावेळी आजूबाजूचे लोक जमा झाले. त्यावेळी आरोपी अनिता हीने त्या लोकांना शिवीगाळ केली त्यावर ते लोक तिथून निघून गेले. त्यावेळी अनिता व साखराबाई हिने आतून दरवाजा बंद करून मयत हौसाबाई हिचेवर चाकूने वार केला व तेथून पळून गेले. त्यानंतर गावातील लोकांनी व तिच्या मुलाने तिस उपचारार्थ सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता, तिने वरील आशयाचा मृत्यूपूर्व जबाब नोंदविला होता. त्यानंतर 6/1/2021 रोजी हौसाबाई उपचारादरम्यान मयत झाली.

पोलिसांनी तपास करून आरोपी विरुद्ध दोषारोप पत्रक दाखल केले होते. सदरचा खटला जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर येथे चालला होता. सदर खटल्यात न्यायालयाने दोन्ही आरोपींना दोषी धरून जन्मठेपेची व दंडाची शिक्षा ठोठावली होती.

सदर शिक्षेविरुद्ध दोन्ही आरोपींनी ॲड. रितेश थोबडे यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते.

अपिलाच्या सुनावणीच्या वेळी ॲड.रितेश थोबडे यांनी आपले युक्तिवादात मयताचा मृत्यूपूर्व जबाब पाहिले असता, तो ऐच्छिक मृत्यूपूर्व जबाब दिसून येत नाही.

तसेच साक्षीदारांचा कोर्टासमोर आलेला पुरावा पाहिला असता मयत ही जबाब देतेवेळी शुद्धीवर असल्याचे दिसून येत नाही, असा युक्तिवाद मांडला, त्यावरून न्यायमूर्तींनी दोन्ही मायलेकींची निर्दोष मुक्तता केली.

यात आरोपीतर्फे ॲड. रितेश थोबडे यांनी तर सरकारतर्फे ॲड. एस एच यादव यांनी काम पाहिले.

# कुंभारी येथे पैशाच्या व्यवहारातून मारहाण; ६६ वर्षीय इसमाचा खून, 04 आरोपी ताब्यात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वळसंग पोलीस ठाणे हद्दीतील कुंभारी शिवारात पैशांच्या व्यवहारातून झालेल्या वादातून एका ६६ वर्षीय इसमास गंभीर मारहाण करून फोन केल्याची घटना सोमवार, दि. २८ सप्टेंबर रोजी सकाळी घडली. या घटनेत दर्याप्पा गंगाराम काळे (वय ६६, रा. पारधी कॅम्प, कुंभारी) यांचा खून झाला.



मिळालेल्या माहितीनुसार, दर्याप्पा काळे हे त्यांची मुलगी राजश्री साळुखे यांच्यासोबत आरोपी निलेश अडगळे यांच्या शेतातील वस्तीवर गेले होते. यावेळी पैशांच्या व्यवहारावरून झालेल्या वादातून आरोपींनी लोखंडी खोरे, कुऱ्हाड व लाकडी बॅटने दर्याप्पा काळे यांना मारहाण करून गंभीर दुखापत करून त्यांचा खून केला. तसेच फिर्यादी महिलेलाही लोखंडी फुकारीने मारहाण करून जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

याप्रकरणी गु.र.नं. ५९४/२०२६ अन्वये BNS कलम १०३(१), ११८(१), १८९(२), १९१(२), १९१(३), १९० तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियमातील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी निलेश अडगळे, प्रकाश अडगळे, मुकेश अडगळे व श्रीदेवी अडगळे या चार आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांना अटक करण्याची कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. गुन्ह्यात वापरलेली कुऱ्हाड, लोखंडी खोरे, लाकडी बॅट व लोखंडी फुकारी जप्त करण्यात आली आहे.

घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. टाकणे, सपोनी राहुल डोंगरे, प्रभारी अधिकारी वळसंग पोलीस ठाणे व ढरक कांबळे यांनी भेट देऊन पाहणी केली.

सदर गुन्ह्याचा तपास माननीय पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी तसेच अप्पर उप अधीक्षक श्री कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी टाकणे हे करीत आहेत.

सपोनि डोंगरे व वळसंग पोलीस ठाणे पोलीस पथकाने सदर गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेऊन तात्काळ अटक केली.

घटनास्थळी परिस्थिती शांत असून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी योग्य तो पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

## वात्रटिका

### जुळवाजुळव

विषय गंभीर आहे,चला
एकत्र येऊन चांगला कांडू...
लोक बघतात आपल्याकडे
आडबाजूला जाऊन भांडू...
एकत्र येऊ,आवाज उठवू
दणक्यात काढू मोर्चा...
आघाडी घेऊ बिघाडी न होता
पण सगळीकडे त्याचीच चर्चा...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# स्वेरीच्या डॉ.बी.पी. रोंगे सरांचे खंडाळ्यात भव्य स्वागत



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य शिक्षक मतदार संघाची निवडणूक प्रक्रिया महिन्यावर येऊन ठेपली असून पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तंत्रशिक्षणातील विविध यशस्वी उपक्रमांमुळे राज्यात ज्ञानयात्री म्हणून ओळख निर्माण झालेले स्वेरीचे डॉ.बी.पी.रोंगे सर हे सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील शिक्षकांशी थेट संवाद साधत आहेत आणि त्यांच्या दौऱ्यांना प्रचंड प्रतिसाद देखील लाभत आहे. ज्याप्रमाणे डॉ. रोंगे सरांच्या प्रयत्नांतून ह्यस्वेरीह्लला यश लाभले त्याचप्रमाणे खंडाळा तालुक्यात ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सुटावे आणि त्यांच्या शिक्षण कार्यात यशस्वी व्हावे, ही अपेक्षा आहे. एकूणच शिक्षकांच्या अडचणी व समस्या सोडविण्यासाठी डॉ. रोंगे सरांकडे एका वेगळ्या आशेने पाहिले जात असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी अर्थात श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटचे संस्थापक, स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य व खेड (ता. उत्तर सोलापूर) मधील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे हे शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर लक्ष केंद्रित करत असल्याचे पहायला मिळत आहे. डॉ.रोंगे सर यांनी गेल्या वर्षापासून पुणे विभाग मतदार संघातील सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे व सोलापूर या पाचही जिल्ह्यांतील शाळा व कॉलेज मधील पदाधिकारी व शिक्षकांना भेटी देऊन त्यांच्या समस्या जाणून घेत आहेत. सर्व ठिकाणी डॉ. रोंगे सरांचे भव्य स्वागत केले जात आहे. या अनुषंगाने प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी शिक्षकांच्या प्रत्यक्ष भेटीच्या रूपाने निवडणुकीच्या प्रचारात आघाडी घेतली असून ते जवळपास प्रत्येक शिक्षकांपर्यंत पोहोचले असल्याचे दिसून येत आहे. स्वेरीच्या स्थापनेपासून डॉ. रोंगे सरांची विविध प्रश्नांची अभ्यासपूर्वक मांडणी, प्रत्येक समस्येचा सुक्ष्म अभ्यास या धोरणांमुळे डॉ. रोंगे सरांच्या तंत्रशुद्ध अभ्यासाचा आता राज्याला फायदा होणार आहे. एकूणच डॉ. रोंगे सरांकडे शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज मंडळीचे लक्ष लागले आहे तसेच त्यांना पाचही जिल्ह्यांतील ५८ तालुक्यांतील शिक्षकांचा भक्कम प्रतिसाद मिळत आहे. मागील वर्षभरापासून प्राचार्य डॉ. रोंगे सरांचे पाचही जिल्ह्यांत झंझावाती दौरे सुरु असून त्यांना सर्वत्र उस्फुर्तपणे प्रतिसाद लाभत आहे. मतदार नोंदणी पासून निवडणूकीच्या सर्व प्रक्रिया याबाबत डॉ. रोंगे सर प्रत्येक शाळेत, प्रत्येक शिक्षकांना, संस्थाचालकांना व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना भेट देवून चर्चा करत आहेत. या चर्चांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये अनेक शिक्षक संघटनांनी व पदाधिकाऱ्यांनी डॉ. रोंगे सरांना पाठिंबा दर्शविला आहे. या भेटीमध्ये सर्व शाळांमध्ये प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी डॉ. रोंगे सरांचे कमालीचे स्वागत करत आहेत. आत्तापर्यंत शिक्षकांच्या प्रश्नांवर फारसे काही केले नसल्याचे जाणवते. त्यामुळे आता डॉ. रोंगे सर यांच्या कामाची पद्धत विकासाकडे नेणारी आहे त्यामुळे शिक्षकांमध्ये उत्साह पसरला आहे. एकूणच डॉ.रोंगे सर यांच्या स्वेरी, एसव्हीआयटी आणि स्वाईप या तिन्ही संस्थांना अल्पावधित मिळालेल्या यशामुळे शिक्षकांची अपेक्षा वाढली आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या आठवड्यात सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील जवळपास १२ शाळा- महाविद्यालयांना भेटी देऊन डॉ. रोंगे सरांनी आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी यावेळी ज्ञानसंवर्धिनी प्रशाला शिरवळ, भैरवनाथ शिक्षण संस्था संचलित क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नायगाव, आदर्श विद्यालय व ज्युनिअर कॉलेज शिरवळ, एम.ई.एस. इंग्लिश मिडियम स्कूल शिरवळ, प्रगती हायस्कूल शिरवळ, श्रीपतराव कदम जुनिअर कॉलेज शिरवळ, शिंदेवाडी माध्यमिक विद्यालय शिंदेवाडी, ग्लोरी इंग्लिश मिडियम स्कूल शिरवळ, श्री समर्थ विद्यामंदिर कण्हेरी, पंचक्रोशी विद्यालय जवळे-लोहोम फाटा, यांसह इतर शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन तेथील शिक्षकांच्या समस्या जाणून घेतल्या. वास्तविक पाहता आमदार होण्यापूर्वीच डॉ. रोंगे सरांनी सोलापूर जिल्ह्यातील रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाळांमधील एकूण २७ मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्या पदोन्नतीनंतर तब्बल आठ महिन्यांपासून प्रलंबित असलेला पदमान्यता व वेतनाचा प्रश्न अखेर मार्गी लावला आहे. त्याचबरोबर सोलापूर जिल्हा सेवा अभियानांतर्गत प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचे निर्देश भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी दिले होते. त्या अनुषंगाने त्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी संतोष साखरे यांच्या माध्यमातून प्राचार्य डॉ. बब्रुवाहन रोंगे यांच्या पाठपुराव्याला यश आले असून शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदोन्नती, नियुक्ती व सेवा विषयक एकूण ३७ प्रकरणे सोडवली गेली आहेत. त्यामुळे संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना न्याय मिळाला आहे. या प्रकरणांच्या अनुषंगाने शिक्षण विभागाने कार्यवाही करत एकाच दिवसात ३७ प्रकरणांची सोडवणूक करून न्याय दिला आहे. त्यामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. या कारणांमुळे डॉ. रोंगे सरांच्या भेटींचे सर्वत्र स्वागत होत आहे. या भेटी दरम्यान बोलताना डॉ.बी.पी. रोंगे सर म्हणाले की ह्यआज शिक्षण क्षेत्रात व शिक्षकांसमोर अनेक प्रश्न व अडचणी आहेत. त्या सर्व शासन पातळीवर अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडण्यासाठी मी सक्षम आहे. टीईटी, जुनी पेन्शन योजना अशा अनेक समस्या आहेत, त्यांचा मी बारकाईने अभ्यास केला आहे. खरे पाहता हे प्रश्न फार पूर्वी सुटायला हवे होते. परंतु उदासीनतेमुळे ते सुटलेले नाहीत. यासाठी जर आपली सेवा करण्याची संधी दिली तर जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक प्रयत्न करून अनुत्तरीत प्रश्न सोडविण्यासाठी कोठेही कमी पडणार नाही.ह्ल अशी ग्वाही त्यांनी दिली. या कारणांमुळे सर्वत्र डॉ. रोंगे सरांना प्रतिसाद मिळत असल्याचे स्पष्ट होते. आमदार होण्यापूर्वीच त्यांनी कांही प्रश्न सोडविले आहेत त्यामुळे डॉ. रोंगे सरांकडे पुणे विभागातील शिक्षक आशेने पाहत आहेत, हे मात्र नक्की जाणवते.

# दुष्काळ निवारण आणि पालकमंत्री पदावरून सातपुते यांचा मोहिते पाटील यांच्यावर हल्लाबोल



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** माळशिरसचे मा आ राम सातपुते यांनी राज्यासह सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळ परिस्थितीवरून राज्य सरकारच्या निर्णयाचे स्वागत करत पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या कामाचे समर्थन केले, तर मोहिते पाटील यांच्यावर संस्था दिवाळखोरीत काढल्याचा आणि तालुक्यातील 22 गावांना पाण्यापासून वंचित ठेवल्याचा गंभीर आरोप केला. भाजपचे मा आ राम सातपुते यांनी पत्रकार परिषदेत खा धैर्यशील मोहिते पाटील आणि विरोधकांवर सडकून टीका केली. श्रीराम निवास मांडवे या ठिकाणी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते

यावेळी हनुमंत सूळ, अॅड बी.वाय.राऊत,चंद्रकांत जाधव मंडलाध्यक्ष सुजयसिंह माने पाटील, मालोजीराजे देशमुख, संजय देशमुख, रणवीर देशमुख, नितीन माळी, पं स सदस्य आनंद शेंडगे, बाळासाहेब सरगर, बाळासाहेब लवटे, बाळासाहेब वावरे, राजेंद्र पांढरे,राहुल पद्मन, काकासाहेब जाधव, गणेश पाटील आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, मागणीनुसार तत्काळ टँकरसाठी एक खिडकी योजना, चारा छावण्या, विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क माफी आणि शेतकऱ्यांसाठी मोफत वीज (झिरो वीज बिल) या योजनांची अंमलबजावणी सुरू झाल्याचे सांगून मुख्यमंत्र्यांनी बार्शी दौऱ्यात दिलेला शब्द 48 तासांच्या आत पाळल्याचे त्यांनी नमूद केले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या मेळाव्यात खा धैर्यशील मोहिते पाटील यांनी जिल्ह्याला चांगला पालकमंत्री हवा असल्याचे विधान केले होते. यावर बोलताना सातपुते म्हणाले की, पालकमंत्री ठरवण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा असतो जयकुमार गोरे हे एका सामान्य शेतकरी व शेतमजुराच्या कुटुंबातून कष्ट करून पुढे आलेले सक्षम नेते आहेत विजय मल्टीस्टेट व सुमित्रा पतसंस्था यांसारख्या संस्था बुडवून राजीनामा देणाऱ्यांना पालकमंत्री बदलण्याची भाषा शोभत नाही, असा टोला त्यांनी लगावला

पंढरपुरातील मेळाव्याला अनुपस्थिती आणि पालकमंत्र्यांशी वाढत असलेली आ उत्तम जानकर यांची जवळीक याबाबत विचारले असता या अगोदरच मुख्यमंत्री व पालकमंत्री यांनी माळशिरस तालुक्यातील भाजपाचे नेतृत्व हे मा आ राम सातपुते करतील यामुळे 2029 ला काय होईल? हे सांगायला ज्योतिषाची गरज नाही आणि भाजप कार्यकर्ते त्या दृष्टीने कामाला लागले आहेत असेही मा आ राम सातपुते यांनी सांगितले .

# सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हा परिषदेत 'माहितीचा अधिकार दिन'



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सेवा संकल्प अभियानाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या वतीने 'माहितीचा अधिकार दिन' यशवंतराव चव्हाण सभागृह येथे आयोजित करण्यात आला. यावेळी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या विविध तरतुदी व अर्ज हाताळण्याच्या प्रक्रियेबाबत अधिकारी-कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष तथा बांधकाम व अर्थ समिती सभापती इंद्रजीत पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) सूर्यकांत भुजबळ यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक यशदाचे मुख्य प्रशिक्षक शिवाजी पवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत अर्ज प्राप्त झाल्यानंतर करावयाची कार्यवाही, उपलब्ध माहितीचे स्वरूप, माहिती देताना घ्यावयाची दक्षता, कायदेशीर तरतुदी, प्रथम अपील तसेच पुढील प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली.

माहिती अधिकार कायद्याची योग्य माहिती व अभ्यास असणे आवश्यक असून, कायद्याच्या तरतुदीनुसार नागरिकांना स्पष्ट, वस्तुनिष्ठ व उपलब्ध माहिती देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असे शिवाजी पवार यांनी सांगितले. विविध उदाहरणांच्या माध्यमातून माहिती अधिकार अर्जांची हाताळणी व कायद्याची अंमलबजावणी याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांनी माहितीचा अधिकार हा लोकशाही व्यवस्थेतील महत्त्वाचा कायदा असल्याचे सांगितले. प्रशासनातील पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढविण्यासाठी माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी माहिती अधिकाराच्या अर्जांकडे सकारात्मक व कायदेशीर दृष्टिकोनातून पाहण्याचे आवाहन केले. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी समजून घेऊन नियमांच्या चौकटीत नागरिकांना आवश्यक माहिती सुलभ, स्पष्ट व वस्तुनिष्ठ पद्धतीने उपलब्ध करून द्यावी, असे त्यांनी सांगितले. प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्याने आपल्या विभागाशी संबंधित माहिती अधिकाराच्या तरतुदींचा अभ्यास करावा, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सामान्य प्रशासन विभागाने प्रयत्न केले.

# सोलापूरकरांची भुईकोट किल्ल्यात भटकंती !

## पर्यटन दिनाच्या निमित्ताने 'इको फ्रेंडली क्लब'चा उपक्रम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापुरात अनेक वर्ष राहून सुद्धा आम्ही कधीच भुईकोट किल्ला पाहिला नव्हता! आज आम्ही फक्त किल्ला पाहिला नाही तर तो जाणूनही घेतला.. अशा बोलक्या प्रतिक्रिया पर्यटनप्रेमी सोलापूरकरांनी व्यक्त केल्या.

जागतिक पर्यटन दिनाच्या निमित्ताने पर्यटनप्रेमी सोलापूरकरांनी रविवारी सोलापूरच्या भुईकोट किल्ल्यात भटकंती करून इतिहास जाणून घेतला.

निसर्ग पर्यटनासाठी प्रयत्नशील असलेल्या इको फ्रेंडली क्लबने भारतीय पुरातत्त्व विभागाच्या सहकार्याने भुईकोट किल्ला भटकंतीचा उपक्रम आयोजित केला होता. भुईकोट किल्ला भटकंतीला पर्यटनप्रेमी सोलापूरकरांनी प्रतिसाद दिला. इतिहास अभ्यासक, लेखक नितीन अणवेकर यांनी भुईकोट किल्ल्याच्या संदर्भात अभ्यासपूर्ण माहिती सांगितली. या उपक्रमात अनेकजण आपल्या लहान मुलांसह सहभागी झाले होते.

दिंडी दरवाजा, हत्ती दरवाजा, शहर दरवाजा, बुरुज, 32 खांबी वास्तु, मुंजा बाबा मंदिर, कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिर, नागबावडी विहीर, पद्मावती देवी मंदिर, खंदक, तोफा, विरगळ यासह विविध शिल्पांची माहिती इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांनी दिली.

अनेक दिवसांची इच्छा आज पूर्ण झाली.. सोलापूरचा भुईकोट किल्ला जवळून अनुभवता आला.. पद्मावती देवी यांच्याविषयी माहिती मिळाली, इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांनी भुईकोट किल्ल्याची छान माहिती दिली अशा प्रतिक्रिया उपस्थित पर्यटनप्रेमी सोलापूरकरांनी व्यक्त केल्या.

'आपल्या शहराचा आणि भुईकोट किल्ल्याचा इतिहास खूपच रंजक आहे. सोलापुरात येणाऱ्या मित्र आणि नातेवाईकांना भुईकोट किल्ला प्रत्येकाने दाखवायला हवा, असे आवाहन इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांनी केले.

प्रारंभी इको फ्रेंडली क्लबचे संस्थापक, वसुंधरा मित्र परशुराम कोकणे यांनी सर्वांचे स्वागत केले. महिन्यातून, आठवड्यातून थोडासा वेळ काढून प्रत्येकाने आपल्या शहरातील, जिल्ह्यातील वारसास्थळे, निसर्ग पर्यटन स्थळ पाहायला हवीत. सर्वांनी सोलापूरच्या पर्यटन विकासासाठी पुढे यावे असे आवाहन श्री. कोकणे यांनी केले.

ही भटकंती यशस्वी करण्यासाठी भारतीय पुरातत्व विभागाचे अधिकारी आदेश मेहर, महादेव कांबळे यांचे सहकार्य लाभले. माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर यांनी भटकंतीमध्ये सहभागी होऊन सर्वांना पर्यटन दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि उपक्रमाचे स्वागत केले.

याप्रसंगी इको फ्रेंडली क्लबचे समन्वयक अजित कोकणे, अर्चना जमादार, पद्मकांत घंटे, पुष्पा घंटे, गंगुबाई कोकणे, सुरेश नारायणकर, अश्विनी नारायणकर, प्रतिज्ञा भोसले, वेंकटेश कुलकर्णी, गणेश बेनगिरी, सरस्वती कोकणे, सुष्मिता कटकधोंड, समर्थ होळकर, प्रज्वल होळकर, अथर्व स्वामी, संतोष कटारे, अजय परांडेकर, त्यागराज होनमोडे, दुर्गकांत वायचळ निवेदिता नाविंदगीकर, कविता बेदरकर, सिद्धार्थ तळभंडारे, महेश , अश्विनी बेळे, शिवकुमार राऊतराव, योगेश चितापुरे, महेश कौडकी, आनंद शिवगुडे, केतकी जोशी, सोमनाथ गुंजोटे, संतोष गवंडी, अस्लम तांबोळी, दिगंबर कोनापुरे, बसवराज परांडकर, हरिदास पेंटा यांच्यासह शेकडो सोलापूरकर तसेच राज मेमोरियल स्कूलचे विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

# MH-13-DE-5602 ट्रॅक्टरच्या लिलावाबाबत हरकती असल्यास २९ सप्टेंबरपर्यंत कळवावे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मा. कुटुंब न्यायालय, विजयपूर यांच्या निर्देशांनुसार नोंदणी क्रमांक MH-13-DE-5602 असलेले ट्रॅक्टर प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांच्यामार्फत जप्त करण्यात आले असून सदर वाहन सध्या कार्यालयाच्या ताब्यात आहे.

या ट्रॅक्टर वाहनाचा शासकीय नियमानुसार लिलाव करण्यात येणार आहे. सदर लिलाव प्रक्रियेबाबत किंवा वाहनाशी संबंधित कोणाचीही कायदेशीर तक्रार अथवा हरकत असल्यास संबंधितांनी दि. २९ सप्टेंबर २०२६ पर्यंत प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत थेट संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

निर्धारित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या तसेच आवश्यक पुष्टी नसलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. त्यानंतर नियमानुसार पुढील कायदेशीर लिलाव प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, विजय पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.


**आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**

**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**

**संपर्क - 9422602337, 8317212037**



## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**


मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**उमेश माने**
मो. 9353370779

**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) युपीतील एक लोकसभा मतदारसंघ २) आकाश, गगन ३) टेनिस स्पर्धेतील विश्वविजेता खेळाडू-*** फेडरर ४) नय उलट लिहा ५) महाराणा प्रताप यांच्या घोड्याचे नाव ६) बिल्डिंग (मराठीत) १०) वाईट सवय १२) धान्याचा ढीग १३) चालू दिवस, एक न्यूज चॅनल-** तक १५) मग्न, लीन, एकरूप होणे १७) आयपीएलमधील एक फलंदाज-*** अय्यर १८) विजेचे लोडशेडिंग (मराठीत) १९) गस्त घालणे, राखण करणे २१) एखाद्या गोष्टीतील रूची, छंद २३) एक म्हण-**** लंगडी गाय शहाणी २४) शालेय पुस्तकांचे प्रकाशन करणारी एक संस्था २६) पावट्याप्रमाणे द्विदल कडधान्य २८) गुरांचे मांस विक्री करणारा २९) विषमच्या विरूध्दार्थी शब्द ३०) भिंतीवरील सरपटणारा प्राणी ३१) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द ३४) मन वळविण्याचा प्रयत्न ३८) भक्कम, कणखर ३९) आकाश (इंग्रजीत) ४०) डोक्याचे केस काळे करणे ४३) मनाला टोचणी लावणारे शल्य ४४) चपाती याच्यावर भाजतात ४५) प्रगती (हिंदीत) ४७) धातूचा तंतू, ४८) डोकेदुखीवर कपाळाला लावायचा मलम ४९) सर्व (हिंदीत)

**आडवे शब्द :** १) आयपीएल क्रिकेट स्पर्धेतील एक संघ ५) महेंद्रसिंग धोनीचा आयपीएल विजेता संघ-*** सुपर किंग्ज ७) देवाचे नामस्मरण, ईशस्तवन ८) आठवड्याचे एकूण दिवस ९) किंमती वस्तू, ऐवज ११) अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष-*** ओबामा १४) व्यायाम, मेहनत १६) शर्यत (इंग्रजीत) १८) देवेंद्र फडणवीसांचा पक्ष २०) निवडणुकीत उमेदवाराला करतात ते **दान २१) इन्कमटॅक्स (मराठीत) २२) एक म्हण-*** तो वजीर २४) इच्छापूर्तीसाठी देवाला घातलेले साकडे २५) मानवाच्या मूलभूत गरजांपैकी एक २७) पौष्टीक, सत्वयुक्त २९) कामातून मिळालेली उसंत ३०) पैंजण (हिंदीत) ३२) सैफ अली खानची अभिनेत्री असलेली मुलगी ३३) पैसे (इंग्रजीत) ३४) जखमेवर लावायचे औषध ३५) सरावलेला, पटाईत ३६) पाणी पिण्याची तीव्र इच्छा ३७) वंदन, रामराम, अभिवादन ४१) पैसा, संपत्ती ४२) यश, सफलता ४३) सातत्याने, नेहमी, खंड न पडता ४६) गानसम्राज्ञी-** मंगेशकर ४८) स्वातंत्र्यापूर्वी स्वदेशीचे नारे देत ब्रिटिशांच्या गाडीसमोर आत्मबलिदान करणारे देशभक्त-** गेणू ४९) कुत्र्याचा जोडीदार ५०) नांदेड लगतचा एक जिल्हा ५१) स्वार्थ, हेतू

## सुडोकु - 65

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 7 | 5 | | | 6 | | 3 |
| 4 | 3 | | | | 6 | | | 5 |
| 6 | | 8 | 1 | | 9 | | 2 | 7 |
| 2 | | 6 | 4 | 5 | | | | |
| | | 1 | | 6 | | 3 | 4 | |
| 7 | | | | | 8 | | 5 | |
| 8 | | | 7 | | | 1 | 3 | |
| | 7 | 4 | | 2 | | 5 | 9 | |
| 1 | | 9 | 3 | | 5 | | | |

# भीमाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

## ऊसाला 3011 रुपये देणार - खा. महाडिक

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** भीमा सहकारी साखर कारखाना लि., टाकळी सिकंदर, ता. मोहोळ, जि. सोलापूर या कारखान्याची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सर्व संचालक, शेतकरी सभासद आणि ऊस उत्पादकांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. यावेळी कारखान्याचे चेअरमन विश्वराज महाडिक यांनी आगामी गळीत हंगामाबाबत महत्त्वाच्या घोषणा करताना यंदा ऊसदराच्या स्पर्धेत भीमा कारखाना अग्रेसर राहील, असा विश्वास व्यक्त केला.

कारखान्याचे चेअरमन विश्वराज महाडिक यांनी डिस्टिलरी व इथेनॉल प्रकल्प लवकरच कार्यान्वित होणार असल्याची ग्वाही सभासदांना दिली. तसेच मागील हंगामात गाळप झालेल्या ८६०३२ जातीच्या ऊसाला जाहीर केल्याप्रमाणे २०० रुपये अतिरिक्त देण्याची घोषणा केली. त्यामुळे सन २०२५-२६ मधील ऊसाला एकूण ३,०११ रुपये दर मिळणार असल्याचे स्पष्ट झाले.

यामुळे सोलापूर जिल्ह्यातील ऊसदराच्या स्पर्धेत भीमा कारखाना आघाडीवर राहिला असून, शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात आले.

भीमा सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक चेअरमन कै. पैलवान भीमराव महाडिक यांनी मोठ्या दूरदृष्टीने आणि संघषार्तून कारखाना उभा केला. त्यांच्या कार्याची आठवण कायम राहावी, यासाठी कारखान्याला त्यांचे नाव देण्याची मागणी शेतकरी सभासदांकडून गेल्या काही वर्षांपासून केली जात होती.

सभेत 'पैलवान भीमराव महाडिक सहकारी साखर कारखाना' असे नामांतर करण्याचा ठराव मांडण्यात आला. सभासदांनी या ठरावाला उत्स्फूर्त मंजुरी देत संस्थापक कै. पैलवान भीमराव महाडिक यांना अभिवादन केले.

कारखान्याचे कार्यकारी संचालक एस. जे. शिंदे यांनी सभेतील विषयांचे वाचन केले. यावेळी सभासदांनी ह्यमंजूर, मंजूरह्लच्या घोषणा देत सर्व विषयांना मंजुरी दिली.

भीमा नदीकाठची जमीन ऊस उत्पादनासाठी सुपीक असून, उजनी धरणातून भीमा नदीला मिळणाऱ्या आवर्तनांची संख्या भविष्यात कमी झाल्यास नदीकाठच्या शेतकऱ्यांसमोर मोठे संकट निर्माण होऊ शकते. याची दखल घेत चेअरमन विश्वराज महाडिक यांनी भीमा नदीला कॅनॉलचा दर्जा देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याची मागणी खासदार धनंजय महाडिक यांच्याकडे केली.

खासदार धनंजय महाडिक यांनी आपल्या भाषणात या विषयाचा संदर्भ घेत, भीमा नदीला कॅनॉलचा दर्जा मिळण्यासाठी सरकारकडे पाठपुरावा करण्याची ग्वाही दिली.

भीमा कारखान्याला मागील सलग तीन हंगाम ऊसपुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना यावर्षी दिवाळीनिमित्त २५ किलो साखर मोफत देणार आणि सर्व सभासदांना देखील माफक दरात 25 किलो साखर देण्यात येईल अशी घोषणा चेअरमन विश्वराज महाडिक यांनी केली.

कारखान्याची मागील सर्व ऊस बिलांची देयके अदा करण्यात आली असून, आगामी हंगामात ऊस बिले देताना कोणतीही अडचण येणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. त्यामुळे मोठ्या संख्येने शेतकरी यंदाही भीमा कारखान्यालाच ऊस घालतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तसेच पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण वाढविण्याच्या धोरणाला पाठिंबा देणारा ठरावही सभेत मांडण्यात आला. इथेनॉल निर्मितीमुळे साखर उद्योगाला पयार्यी उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध होऊन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा फायदा होऊ शकतो, या भूमिकेतून सभासदांनी ठरावास मंजुरी दिली.




**भीमा नदीला कॅनॉलचा दर्जा मिळणे गरजेचे - चेअरमन विश्वराज महाडिक**

भीमा नदीला उजनीतून येणाऱ्या आवर्तनांची संख्या कमी होण्याचे संकट निर्माण झाल्यास शेतकरी मोठ्या अडचणीत येऊ शकतो. यावर्षी दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या भीमा पट्ट्यातील शेतकऱ्यांना भविष्यात पाण्याची अडचण भासू नये, यासाठी भीमा नदीला कॅनॉलचा दर्जा मिळणे गरजेचे आहे. यासाठी खासदार धनंजय महाडिक यांनी शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी आम्ही केली आहे.

**साखरेचा किमान हमीभाव वाढवण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करणार - खा. धनंजय महाडिक**

साखरेचा एमएसपी अर्थात किमान हमीभाव वाढवण्यासाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. गेल्या काही वर्षांत एमएसपीमध्ये काही प्रमाणात वाढ करण्यात आली आहे. मात्र ऊस उत्पादनासाठी वाढलेला खर्च आणि साखरेचा विक्री दर यांचा विचार करता त्यामध्ये भरीव वाढ होणे अपेक्षित आहे. इथेनॉल निर्मितीला चालना आणि साखरेच्या किमान हमीभावात वाढ झाल्यास साखर उद्योग तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल.

# सोलापूर जिल्ह्यातील सर्व 11 तालुक्यांत Trigger-1 लागू

## शेतकऱ्यांना महसुलात सूट, पीक कर्ज पुनर्गठन, कर्जवसुलीस स्थगिती

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** खरीप हंगाम 2026 मधील पर्जन्यमानातील तूट व अन्य दुष्काळी घटकांच्या आधारे सोलापूर जिल्ह्यातील सर्व 11 तालुक्यांमध्ये Trigger-1 (प्रथम कळ) लागू करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने 25 सप्टेंबर 2026 रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, सांगोला, माळशिरस आणि मंगळवेढा या सर्व तालुक्यांचा दुष्काळी उपाययोजनांमध्ये समावेश करण्यात आला आहे.

ट्रिगर 1 (Trigger-1) लागू झाल्याने जिल्ह्यातील संबंधित दुष्काळग्रस्त भागात पंचनाम्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सर्वेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शविणारी छायाचित्रे व ऋुहर कोऑर्डिनेट्स संकलित करून पिकांच्या परिस्थितीचा अहवाल कृषी आयुक्तांमार्फत शासनास सादर करण्यात येणार आहे.

**शेतकऱ्यांना मिळणार विविध सवलती -**

शासन निर्णयानुसार सोलापूर जिल्ह्यातील लागू तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन आणि शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्यात येणार आहे. यामुळे पात्र शेतकऱ्यांना कर्ज परतफेडीचा तातडीचा आर्थिक ताण कमी करण्यास मदत होणार आहे.

तसेच कृषी पंपाच्या चालू वीजबिलात सूट देण्याची तरतूद करण्यात आली आहे. 7.5 अश्वशक्तीपर्यंत क्षमतेच्या कृषी पंपांचे वीजबिल यापूर्वीच माफ करण्यात आले असून, त्यावरील क्षमतेच्या पंपांना या शासन निर्णयानुसार संबंधित सवलत लागू राहणार आहे.

**टंचाईग्रस्त गावांमध्ये शेतीपंपांची वीज जोडणी खंडित न करण्याचे निर्देश-**

टंचाई जाहीर केलेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या शेतीपंपाची वीज जोडणी खंडित न करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे पाणीटंचाईच्या काळात उपलब्ध पाण्याचा शेतीसाठी वापर करण्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

**पीक नुकसान मदतीबाबत स्वतंत्र शासन निर्णय -**

महत्त्वाचे म्हणजे, या शासन निर्णयात शेतपिकांच्या नुकसानीबाबतची आर्थिक मदत अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. संबंधित विहित कार्यपद्धती पूर्ण केल्यानंतर शेतपिकांच्या नुकसानीबाबतची मदत स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहीर केली जाणार आहे, असे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सर्व 11 तालुक्यांचा Trigger-1 अंतर्गत समावेश झाल्याने संबंधित विभागांनी शासन निर्णयातील उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे अपेक्षित आहे. पंचनामे, पिकांची वस्तुनिष्ठ स्थिती नोंदविणे, पाणीपुरवठा, चारा, रोजगार व जलसंधारणाच्या उपाययोजनांना स्थानिक परिस्थितीनुसार प्राधान्य देण्यात येणार आहे.

**पाणी, चारा आणि रोजगाराच्या उपाययोजनांनाही प्राधान्य-**

आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरू करणे, शेतकरी व शेतमजुरांना अन्नधान्याची टंचाई भासू नये यासाठी व्यवस्था करणे तसेच जनावरांसाठी आवश्यक चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजना शासनाने निश्चित केल्या आहेत.

याशिवाय जलसंधारणाची कामे सुरू करणे तसेच पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या पाण्याचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागात पाणी उपलब्धता, रोजगार आणि पशुधनासाठी आवश्यक उपाययोजनांना प्रशासनाकडून प्राधान्य देण्यात येणार आहे.

# सिंहगडच्या लेझीम पथकाने वेधले लक्ष; पारंपरिक खेळाने गणेश विसर्जन मिरवणुकीत भरला रंग

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव-सोलापूर कॅम्पस येथे लाडक्या गणरायाला मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. यंदाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीचे खास आकर्षण ठरले ते एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांचे बहारदार लेझीम पथक. पारंपरिक वेशभूषा, शिस्तबद्ध हालचाली आणि लेझीमच्या विविध डावांनी विद्यार्थ्यांनी संपूर्ण परिसराचे लक्ष वेधून घेतले.



दुपारच्या सुमारास गणरायाच्या विसर्जन मिरवणुकीला उत्साहात सुरुवात झाली. सिंहगडच्या सुमारे ९० एकरांच्या विस्तीर्ण कॅम्पसमधून ही मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांचा निनाद आणि गणपती बाप्पाच्या जयघोषात लेझीम पथकाने ठिकठिकाणी विविध पारंपरिक डाव सादर केले. लेझीमचा ठेका, विद्यार्थ्यांचा जोश आणि शिस्तबद्ध सादरीकरणामुळे मिरवणुकीला विशेष रंगत आली.

या मिरवणुकीतील आणखी एक लक्षवेधी क्षण म्हणजे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी स्वतः विद्यार्थी-विद्यार्थिनींसोबत लेझीम खेळात सहभाग घेतला. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांसोबत लेझीमचा ठेका धरत त्यांचा उत्साह वाढविला. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

संपूर्ण कॅम्पसमधून फिरत मिरवणूक सायंकाळी विसर्जनस्थळी पोहोचली. यावेळी सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या हस्ते श्री गणरायाचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळेस प्राचार्य डॉ शंकर नवले, मुख्य प्रबंधक डॉ. डी. आय. नवले, यांच्यासह विविध विभागातील विभाग प्रमुख, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. आरती व प्रार्थनेनंतर भक्तिमय वातावरणात कॅम्पसमधील विहिरीत श्री गणरायाचे विसर्जन करण्यात आले.

'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. पारंपरिक संस्कृतीचे जतन, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि विशेषतः लेझीम पथकाच्या बहारदार खेळामुळे यंदाची गणेश विसर्जन मिरवणूक संस्मरणीय ठरली.

# अकलूज ते मोडनिंब एस.टी. बससेवा सुरू

## खा धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** परिसरातील नागरिक, विद्यार्थी व प्रवाशांच्या मागणीनुसार अकलूज ते मोडनिंब एस.टी. बससेवा श्रीपूर, नेवरे, करकंब मार्गे सुरू करण्यात यावी, अशी मागणी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्याकडे करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सोलापूर विभाग नियंत्रकांकडे पत्राद्वारे पाठपुरावा करून ही बससेवा सुरू करण्याच्या सूचना केल्या होत्या.



या पाठपुराव्याला यश आले असून, अकलूज आगारामार्फत अकलूज-श्रीपूर-नेवरे-करकंब-मोडनिंब या मार्गावर एस.टी. बससेवा सुरू केली आहे.या बससेवेमुळे अकलूज, श्रीपूर, नेवरे, करकंब तसेच मोडनिंब परिसरातील नागरिकांना मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे. विशेषतः शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी तसेच नियमित प्रवाशांना या बससेवेचा फायदा होणार असून, या मार्गावरील दळणवळण अधिक सुलभ होणार आहे.

प्रस्तावित वेळापत्रकानुसार अकलूज व मोडनिंब दरम्यान दिवसातून विविध फेऱ्या चालविण्यात येणार आहेत. सकाळपासून सायंकाळपर्यंत बससेवा उपलब्ध होणार असल्याने नागरिकांना ये-जा करण्यासाठी सोयीचे साधन उपलब्ध होणार आहे.

या मार्गावर एस.टी. बससेवा सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने करण्यात येत होती.या बससेवेमुळे अकलूज व मोडनिंब परिसरातील प्रवाशांची मोठी गैरसोय दूर होणार असून, नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

# ऑर्किड स्कूलच्या विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील नामांकित नागेश करजगी ऑर्किड स्कूल, सोलापूर मधील विद्यार्थ्यांनी शालेय शहरस्तरीय क्रिडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे.या चमकदार कामगिरीच्या जोरावर शाळेतील खेळाडूंची विभागीय क्रिडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

नुकत्याच पार पडलेल्या क्रिडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत सोमपा क्रिडा कार्यालय सोलापूर शालेय शहरस्तरीय क्रिडा स्पर्धेत सोलापूर शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कूल मधील विद्यार्थ्यांनी २ गोल्ड, ३ सिल्वर व २ ब्रॉंझ पदकांची कमाई केली. यामध्ये रिषभ गोचडे, मृण्मयी गायकवाड, प्रतिक शिंदे, बाळराजे थोरात, श्रेयश कदम, आराधना कांबळे, शिवानी पाटील या पदकविरांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांनी लॉनटेनीस, स्केटिंग, वुशो या क्रिडा प्रकारांमध्ये आपले कौशल्य सिद्ध केले. उत्कृष्ट तांत्रिक खेळ, अष्टपैलु कामगिरी आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी प्रतिस्पर्ध्यावर मात करत विभागीय स्तरावर आपले स्थान निश्चित केले आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार दादा करजगी, संस्थेच्या सचिवा सौ. वर्षाताई विभुते, स्कूलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, स्कूलच्या मार्गदर्शीका मीना पारखे, प्राचार्या रश्मी कुंभार यांनी त्यांचे कौतुक केले. वरील सर्व यशस्वी खेळाडुंना शाळेचे क्रिडा विभाग प्रमुख आनंद लिगाडे, ज्ञानदिप जाधव तसेच प्रशिक्षक महेश झांबरे, अभिजीत रंक, संमित यादवाड, रमेश दोडमणी यांचे मार्गदर्शन लाभले.

# नातेपुते महाविद्यालयात अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अंमली पदार्थांचे शरीरावर होणारे दुष्परिणाम व व्यसनमुक्ती याबाबत जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. उच्च शिक्षण सहसंचालक, सोलापूर तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या परिपत्रकानुसार हा उपक्रम घेण्यात आला.यावेळी कु. श्रुती सूळ, मास्टर स्वयंसेवक यांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन केले. व्यसनामुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत असून युवा पिढीवर त्याचे गंभीर परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. व्यसनमुक्त जीवनाचा संकल्प करून समाजातही व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. भगवानराव साळुंखे म्हणाले, 'विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. अमली पदार्थ आणि कोणत्याही प्रकारचे व्यसन हे विद्यार्थ्यांच्या आरोग्यासोबतच त्यांच्या शिक्षणावर व भवितव्यावर परिणाम करते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यार्ने व्यसनापासून स्वतःला दूर ठेवून आपल्या मित्रांनाही त्यापासून परावृत्त करावे. निरोगी युवकच सक्षम समाज आणि मजबूत राष्ट्र घडवू शकतो. व्यसनमुक्त समाज निर्माण करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा,' असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. जगदीशचंद्र मुळीक व प्रा. उत्तम सावंत यांनी केले.यावेळी प्रा. डॉ. कमल कांबळे, प्रा. अमर वाघमोडे, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. सतीश पाटील, प्रा. सौरभ सावंत, प्रा. पंकज कोडलकर, महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी नागराज करपे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# शेटफळच्या भीमनगर हल्ला प्रकरणात १३ जणांना अटक

## बौद्ध वस्तीला तातडीने संरक्षण द्या- उत्तरेश्वर कांबळे

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील शेटफळ येथील भीमनगर परिसरात २४ सप्टेंबर रोजी झालेल्या हल्लूयाच्या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे. या प्रकरणी मोहोळ पोलिसांनी १३ जणांना अटक केली असून, त्यांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्याची माहिती आहे. या प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या प्रथम माहिती अहवालात (FIR) भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियमातील कलमांचा समावेश करण्यात आला आहे. FIR मध्ये ३७ व्यक्तींची नावे नमूद करण्यात आली असून, त्यांच्यासह इतर सुमारे १०० व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याचे नमूद आहे.

**पोलिसांनाही धक्काबुक्की केल्याचा FIRमध्ये आरोप...**

फिर्यादी अरविंद सिद्धेश्वर थोरात यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २४ सप्टेंबर रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास भीमनगर परिसरात पोलिसांचा बंदोबस्त असतानाही मोठा जमाव घराच्या दिशेने आल्याचा आरोप करण्यात आला आहे. जमावाला रोखण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला असता, पोलिसांनाही धक्काबुक्की करून बाजूला सारल्याचा उल्लेख FIRमध्ये आहे. त्यानंतर घराची तोडफोड करून घरातील व्यक्तींना मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, लोखंडी पाइप आणि लाकडी दांडक्यांचा वापर करून मारहाण करण्यात आली. या घटनेत काही जण जखमी झाल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. एका व्यक्तीच्या डोक्यावर लोखंडी पाइपने प्रहार केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

**बौद्ध वस्तीला संरक्षण देण्याची मागणी....**

या घटनेच्या पार्श्वभूमीवर भीमनगर अर्थात बौद्ध वस्तीमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने आणि कायमस्वरूपी पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी कांबळे यांनी केली आहे.

मंदिर प्रवेशाच्या प्रश्नावरही त्यांनी भूमिका मांडली असून, जातीय तणाव निर्माण होणाऱ्या परिस्थितीत बुद्ध विहार आणि आधुनिक बौद्ध धम्माच्या मूल्यांना प्राधान्य देण्याचे आवाहन बौद्ध समाजाला केले आहे.

**स्वतंत्र चौकशीची मागणी....**

शेटफळ गावातील सामाजिक परिस्थितीची स्वतंत्र चौकशी करण्यात यावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी कांबळे यांनी केली आहे. ग्रामपंचायतीचा निधी रोखावा तसेच ग्रामपंचायत बरखास्त करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. मात्र, अशा प्रकारच्या प्रशासकीय कारवाईसाठी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडून स्वतंत्र चौकशी आणि कायदेशीर प्रक्रिया आवश्यक असते.

**तपासातून सत्य समोर येण्याची अपेक्षा....**

या प्रकरणात गंभीर स्वरूपाचे आरोप FIRमध्ये नोंदविण्यात आले असून, पोलिसांनी १३ जणांना अटक केली आहे. न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी दिल्याने तपास यंत्रणेसमोर हल्लूयाची नेमकी पार्श्वभूमी, जमावाची संख्या, पोलिसांना अडथळा आणल्याचा आरोप, मारहाणीत प्रत्येकाची भूमिका तसेच इतर संबंधित बाबींचा तपास करण्याचे आव्हान आहे.

या सर्व बाबींची निष्पक्ष आणि पुराव्यांच्या आधारे चौकशी होऊन घटनेमागील सत्य समोर यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**उत्तरेश्वर कांबळेंची कठोर कारवाईची मागणी...**



या घटनेनंतर भीम आर्मीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष उत्तरेश्वर कांबळे यांनी प्रतिक्रिया व्यक्त करत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी दिल्याने तपासाला वेग येण्याची अपेक्षा आहे. मात्र, केवळ अटक आणि पोलीस कोठडीपुरती कारवाई न राहता हल्ल्यामागील संपूर्ण पार्श्वभूमी, जमावाची भूमिका, पोलिसांशी झालेली कथित धक्काबुक्की, मारहाण आणि तोडफोड या सर्व बाबींची सखोल चौकशी करावी, अशी मागणी कांबळे यांनी केली आहे. तसेच, प्रकरणातील परिस्थिती आणि लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींच्या आधारे मोक्का कायद्यांतर्गत कारवाईचा विचार करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# कुचन प्रशालेच्या हॅन्डबॉल संघाची शहरस्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांकाची कामगिरी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका, सोलापूर व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय हॅन्डबॉल स्पर्धेत १७ वर्षाखालील (वल्र्ीी१-17) गटात पद्मशाली शिक्षण संस्था संचलित, कुचन प्रशालेच्या मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला. काल झालेल्या शहरस्तरीय स्पर्धेत प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत ही उल्लेखनीय कामगिरी केली.

कुचन प्रशालेच्या संघातील विद्यार्थ्यांनी संपूर्ण स्पर्धेत सांघिक खेळ, उत्तम बचाव आणि आक्रमक खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्धी संघांना चांगली झुंज दिली. त्यांच्या या कामगिरीमुळे प्रशालेच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा जोडला गेला आहे.



या संघातील विद्यार्थ्यांमध्ये सुनील गुंजाळ,समर्थ गुंजाळ,भागेश राठोड,प्रेमकुमार भोसले,मूबिन शेख, विशाल शेकापुरे, अथर्व वनस्कर, अथर्व शेकापुरे, श्रीधर सोमा, चरण मैले, वेदांत पल्ली, आदित्य बंदपट्टे, आदित्य जाधव, श्रवण चव्हाण, नितीन भिमनपल्ली,सतीश राठोड यांचा समावेश आहे.

या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक गोकुळ यादव, पवन भोसले सागर गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम, शालेय समितीचे अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली तसेच संस्थेचे सर्व विश्वस्त यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

तसेच प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु, प्रणिता सामल, मल्लिकार्जुन जोकारे तसेच सर्व शिक्षकांनी विजयी संघाचे कौतुक करून पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कुचन प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी हॅन्डबॉल मध्ये मिळवलेल्या या यशामुळे प्रशालेत आनंदाचे वातावरण असून, विद्यार्थ्यांच्या या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.